महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम १२४ (२) अन्वये राज्यातील शैक्षणिक संस्था/ वैद्यकिय संस्था/धर्मादाय संस्थांच्या बांधकाम/ विकास प्रस्तावामध्ये विकास शुल्कास अंशत: सवलत देणेबाबत दि.२४/०५/१९९३ रोजी शासनाने पारित केलेल्या अधिसूचनेस पुरक पत्र निर्गमित करणे बाबत.

# अधिसूचना

## (पूरक पत्र )

## महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**दिनांक:- १८ /१२/२०१८**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६.

**क्र.टिपीएस -२०१७/३०८/प्र.क्र.२९७/१८/नवि-१३.** ज्या अर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२४ (फ) मधील पोट कलम क्र. (२) अन्वये शासनास असलेल्या अधिकारात (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) शासनाने राज्यातील शैक्षणिक संस्था/ वैद्यकिय संस्था / धर्मादाय संस्थाच्या बांधकाम / विकास प्रस्तावामध्ये विकास शुल्कास अंशत: सवलत देणेबाबत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२९३/३२/प्र.क्र.८/९३/नवि-१२, दि.२४/०५/१९९३ अन्वये अधिसूचना निर्गमित केली असून (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) ती महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि. १५/०७/१९९३ रोजी पृ.क्र.७२५ ते ७२६ वर प्रसिध्द करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेद्वारे शासनाने पारित केलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० च्या तरतूदीप्रमाणे नोंदणीकृत असणा-या स्वतंत्र भूखंडातील शैक्षणिक संस्था धर्मादाय आयुक्तांनी मंजूर केलेल्या ध्येय धोरणाचे पालन करणा-या असल्यास अशा मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थाना उक्त शासन अधिसूचनेमधील भाग- (ब) मध्ये नमूद केल्यानुसार त्या त्या स्तरावरील शैक्षणिक कारणास्तव करित असलेल्या बांधकामापोटी विकास शुल्काच्या रक्कमेमधून ५० % ते ७५% पर्यंत सवलत मिळण्यास पात्र असल्याबाबत तरतूद करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसचूनेमधील **परिशिष्ठ भाग-अ मधील अनु.क्र.** (iii) मधील तरतूदीनुसार सदरची सवलत मिश्र वापरासाठी लागु राहणार नाही. अशी बंधनात्मक अट उक्त अधिसूचनेमध्ये नमूद आहे ;

आणि ज्याअर्थी, एखादी शैक्षणिक वापराखालील इमारत ही प्राथमिक व माध्यमिक या दोन्ही प्रयोजनासाठी वापरासाठी असेल तर अशा स्वरुपाच्या वापराच्या इमारतींना विकास शुल्कामध्ये सवलत देतांना तसेच शैक्षणिक वापराचे माध्यम जसे मराठी/ इंग्रजी /ऊर्दु असल्यास त्यांना देखील सदरची सवलत देणेमध्ये काही नियोजन प्राधिकरणाच्या स्तरावर साशंकता असल्याचे शासनाचे निदर्शनास आलेले आहे;

**आणि ज्याअर्थी उक्त अधिसूचनेमधील** तरतूदींची अंमलबजावणी करतांना सुसुत्रता असावी व्हावी या उद्देशाने शासन सोबतच्या प्रपत्र-**अ** प्रमाणे **उक्त अधिसूचनेस** पूरक पत्र निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नांवाने व आदेशानुसार,

(रा.म.पवार)

**अवर सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रत :-**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. राज्यमंत्री, (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

१) सह सचिव तथा संचालक (नगर रचना), नगर विकास विभाग.

२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य , पुणे.

३) उपसंचालक, नागरी संशोधन घटक, पुणे.

/- यांनी सदरची अधिसूचना (पूरक पत्र) राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, आयुक्त, महानगरपालिका, मुख्याधिकारी नगरपालिका, नगर पंचायती, सह संचालक, नगर रचना, सहायक संचालक,नगर रचना, शाखा कार्यालये यांना पाठविण्याची व्यवस्था करावी.

४) व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे.

त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे शासकीय अधिसूचना (**पूरक पत्र**) महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रामध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी ५० प्रती या विभागास, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांना पाठवाव्यात.

५) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

सदर **अधिसूचना** (पूरक पत्र ) विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

६) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

सदरची **अधिसूचना (पूरक पत्र** ) शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.

७) निवड नस्ती (नवि-१३)

# NOTIFICATION

**(Addendum)**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

**Urban Development Department**

**Mantralaya, Mumbai-400032.**

**Date : 18 /12/2018**

Maharashtra Regional & Town Planning Act,1966.

No.TPS-2017/308/C.R.No.297/18/UD-13:- Whereas, The Government in the Urban Development Department had issued Notification No.TPS-1293/32/C.R.8/**93**,UD-12, Dt. 24/05/1993 along with the **Schedule** under sub section (2) of Section 124 F of the Maharashtra Regional & Town Planning Act, to partially exempt from the payment of development charge payable on the development of any land or building, by any educational institution, medical institution or charitable institution (hereinafter referred to as "the said Notification " ) which was published at Page No. 725 to o 726 in the Maharashtra Government Gazette, dated 15/07/1993 ;

And whereas , the following Notification (Addendum) is hereby issued by the Government as mentioned in Annexure -A appended hereto and accordingly the Notification dated 24/05/1993 shall stand modified .

**Annexure -A**

| Sr.No. | Existing Provision | Revised Provision |
|---|---|---|
| 1 | ***Schedule***<br>(A) Essential conditions for claiming exemptions under section 124F of the said Act :-<br>(iv) NIL | ***Schedule***<br>(A) Essential conditions for claiming exemptions under section 124F of the said Act :-<br>***(iv) If the user of the building for which exemption is sought is combination of mixed user like Primary School on part area and Secondary School on part area, then the exemption shall be given on the basis of proportionate built-up area of the said user. This concession is permissible for all mediums of education.*** |

Copy of the Notification (Addendum) issued by State Government shall be kept open for inspection by the general public in the office hours on all working days for a period of 30 days in the Office of the Director of Town Planning Maharashstra State, Central Building, Pune-411 001.

This Notification (Addendum) shall also be made available on the Government web-site www.maharashtra.gov.in (कायदे व नियम).

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

(R. M. Pawar)
Under Secretary of Government